माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १०९५/२०२१**

**अपिलार्थी, श्री. गणेश लक्ष्मणराव डेहनकर**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
ग्राम पंचायत, रोठा, ता. जि. वर्धा.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (शिक्षण),**
पंचायत समिती, वर्धा, ता. जि. वर्धा.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २१.०२.२०२३**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित (प्रतिनिधी)**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०८.०२.२०२१ | निरंक | २२.०३.२०२१ | ११.०६.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी, यांच्याकडे **दिनांक ०८.०२.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "शांता रामचंद्र डेहणकर यांचा मुत्यु दाखला मिळण्याबाबत" माहिती मागीतलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतीसाद दिल्याचे कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक २२.०३.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे “विहित मुदत समाप्त होऊन सुध्दा माहिती न प्राप्त झाल्यामुळे” असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११.०६.२०२१ रोजी सुनावणी घेवून, सदर प्रकरणातील माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्यामुळे त्यांची परवानगी घेवून माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे आदेशीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०५.०५.२०२१** रोजी " प्रथम अपील न घेतल्यामुळे " असे कारण नमुद करून द्वितीय



माहिती आयोग खंडपीठ

अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक **२१.०२.२०२३** रोजी सुनावणी आयो[illegible] करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा **सचिव** श्री. रामदास राठोड उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा **विस्तार अधिकारी (शिक्षण)** यांचेतर्फे **सचिव** श्री. डी रामदास राठोड उपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दि. ०५.०५.२०२१ रोजी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जावर आज झालेल्या सुनावणी दरम्यान सादर कागदपत्राचे अवलोकन व उपस्थितांचे युक्तिवाद विचारात घेता, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्या वतीने कलम ११ (१) नुसार वरील माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्यामुळे उघड करावी किंवा कसे ? यांची विचारण केली असता, दिनांक ०२.०३.२०२१ रोजी मृत शांताबाई रामचंद्र डेहनकर यांचे मृत्युचा दाखल कोणालाही देण्यात येवू नये असे पंढरीनाथ रामचंद्र डेहनकर यांनी ग्राम पंचायतला अर्ज करुन माझ्या घरच्या सदस्यांच्या व्यतिरीक्त अन्य कोणालाही मृत्युचा दाखला देण्यात येवू नये, याबाबत ग्राम पंचायत रोठाला अर्ज सादर केला होता, असे सुस्पष्टपणे कळविले आहे. ही बाब नमुद करीत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये सदर माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबधीत असल्या कारणाने कलम ११ (१) अन्वये सदर माहिती त्रयस्थ पक्षाच्या परवानगी शिवाय देणे अभिप्रेत नाही. या कारणाने जन माहिती अधिकारी ग्राम पंचायत रोठा कडून सदर माहिती देता येत नाही, असे कळविले.

त्यानंतर अपिलार्थी यांनी प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यावर दिनांक ११.०६.२०२१ रोजी प्रत्यक्षात सुनावणी घेण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली भुमिका माहिती अधिकार कायद्याचे कलम ८ (१) (त्र) नुसार त्रयस्थ पक्षाशी संबंधीत व्यक्तीशी निगडीत असल्याचा निष्कर्ष नोंदवित अपील अर्ज फेटाळल्यामुळे अपिलार्थी यांनी त्याविरुध्द दिनांक २७.०४.२०२१ रोजी द्वितीय अपिल अर्ज दाखल केला. दाखल केलेल्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कलम ११ (१) नुसार विहित प्रक्रीया राबविली असुन कलम ८ (१) (त्र) नुसार त्रयस्थ पक्षाशी संबंधीत खाजगी पणाची माहिती तसेच व्यापक जनहित साध्य होत नसल्याचा हवाला देत माहिती देण्यास नकार दिला असुन माहिती अधिकार कायद्यानुसार प्रथमदर्शनी सुसंगत असल्याचे आढळुन येते.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर, नागपूर

तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने या खाजगीपणाची व त्रयस्थ पक्षाशी संबंधित असलेल्या माहितीबाबत **स्पेशल लीव्ह पिटीशन क्र.२७७३४/२०१२, गिरीश रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयोग** या प्रकरणात दिलेला निर्णय व त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण २०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा, मंत्रालय मुंबई-४०००३२, दिनांक १७ ऑक्टोबर २०१४ रोजीचे परिपत्रक हे दोन्ही वरील प्रकरणात गैरलागू आहे.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेले आदेश हे माहिती अधिकार कायद्याशी सुसंगत असल्याचे असे आढळुन येत असल्याने प्रस्तूत व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील फेटाळण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २१.०२.२०२३**

जावक क्रमांक 4000 दिनांक 30 AUG 2023